महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

# जळगांव पाटबंधारे विभाग, जळगांव

गिरणा कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जळगांव
☏ 0257-2238869 ℻ 0257-2239869
ई-मेल :- eejidjal@gmail.com

**सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त अधिकारी यांना कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबतची जाहिरात.**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५ / प्र.क्र.१००/ १३ / मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुबंई ४०००३२ दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार जलसंपदा विभागाच्या म.अ.अ.व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव या प्राधिकरणांतर्गत सिंचन व बांधकाम दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करणे दुरुस्तीचे काम करणे कार्यालयीन कामकाज सिंचन व्यवस्थापनेशी संबंधीत सर्व अहवाल पाणी वापर संस्था स्थापन करणे अस्तांतरण करणे तसेच अनुषंगीक इत्यादी विवक्षीत प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी संवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांची सेवा करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी खालील पदासांठी मान्यता मिळाल्यानुसार अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पदसंख्या | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | शाखा अभियंता, | ४ | क.अ. / शा.अ./स.अ.श्रे.२ किंवा समकक्ष पदावर ३ वर्षाचा अनुभव |

प्राप्त अर्जामधुन पात्र उमेदवारांची निवड करुन सुची (Panel) तयार करण्यात येईल सदर उमेदवारामधुन सुयोग्य उमेदवाराची उपरोक्त नमुद शासन निर्णयातील विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहुन १ वर्षासाठी करार पध्दतीने नेमणुक करण्यात येईल.

सदर नेमणुकीसंदर्भातील लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई जलसेवा या वेबसाईटवर https:/wrd/maharashtra.gov.in चे मुखपृष्ठावर उपलब्ध आहे. तसेच नमुना अर्ज व अटी /शर्ती कार्यकारी अभियंता, जळगांव पाटबंधारे विभाग, जळगांव या कार्यालयात उपलब्ध आहे.

वरील प्रमाणे पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी कार्यकारी अभियंता, जळगांव पाटबंधारे विभाग, जळगांव गिरणा कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जळगांव यांच्याकडे दिनांक २७/८/२०२१ (सांयकाळी ५ वाजेपर्यंत) अर्ज सादर करावेत.

(ध.ब.बेहेरे,)
कार्यकारी अभियंता,
जळगांव पाटबंधारे विभाग,
जळगांव.

Scanned by CamScanner

:- सदर नेमणूका हया खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधीन राहतील:-

१) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी ज्या पदासाठी अर्ज केले आहे त्या पदाच्या विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता व किमान तीन वर्षाचा अनुभव असो आवश्यक आहे.

२) सदर नेमणूका हया एक वर्षच्या कालावधीसाठी आहत. एक वर्षापेक्षा जास्त कालावधी वाढवीण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी शासन मान्यतेने तसा निर्णय घेवू शकता

३) नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहीत कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र./संकीर्ण -२७१५/प्र.क्र. १००/१३ मादामकामा मार्ग हुतातमा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई.४०००३२ दिनांक १७/१२/२०१६ मधील अटी व शर्ती प्रमाणे शासन निर्णया सोबत असलेल्या परिशिष्ठ अ नुसार मासीक परिश्रमिक म्हणून त्यांना अनुज्ञेय राहिल

४) करार पध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही विभागात /संवर्गात सेवा समावेशना बाबत किंवा सामावून घेण्या बाबत वा नियमीत सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल याबाबत अर्जदाराने रु.१००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देणे बंधनकारक राहिल.

५) करारपध्दतीवर नियुक्ती करण्यात येणाऱ्या (व्यक्ती) अधिकारी त्यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतचे पदावर कार्यरत राहु शकतील

६) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांची शारीरीक,मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्या बाबत जिल्हा शल्यचिकीत्सक अधिकाऱ्याचे मुळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

७) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमणूक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यकतीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र अटी व शर्ती संबंधित उमेदवाराला मान्य आहेत.हया बाबतचे उमेदवाराने रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील.

८) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी विरुध्द कोणत्याही प्राकरची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण चालू अथवा प्रलंबित नसावे. या बाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहे त्या संबंधित कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

९) नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील

१०) सदर अधिकारी त्यांच्यावर सोपविलेल्या /पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा. अशा अधिंकारी यांनी Conflict of interest जाहिर करणे आवश्यक राहील.

११) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अधिकारी यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृततीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१२) अशा कराक पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती कामा बाबत व आधारसामग्री बाबत गोपनियता पाळणे बंधनकारक राहील.

१३) नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहीत. करार पध्दतीने नियुंक्त झालेल्या अर्जदारास नेमूण दिलेले काम समाधान कारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

१४) अर्ज करणाऱ्या सेवानिवृतत अधिकारी यांनी शेवटच्या ५ वर्षाच्या गोपनिय अहवालाची प्रतवारी संबंधित कार्यालयाकडून प्रमाणित करुन तसे प्रमाणपत्र सादर करावे. तसेच प्रशस्तीपत्र / नैपुण्या काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जा सोबत जोडण्यांत यावे.

१५) क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्भवल्यास कोणत्याही परिस्थितीत कार्यालय/शासन त्यास बांधील /जबाबदार राहणार नाही.

१६) अर्ज करतेवेळी सेवानिवृत अधिकारी यांनी त्यांचे कुटुंब निवृत्ती वेतन मंजूरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करावेत





Scanned by CamScanner

१७)करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुकतीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांका पासून १५ दिवसाचे आत रुजू होणे बंधनकारक राहील.अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपूष्टात येईल

१८) मुलाखतीकरिता पात्र उमेदवारांना पत्र ई मेल व्दारे /पोष्टाव्दारे पाठविण्यांत येईल. व भ्रमणध्वनी वर लघुसंदेशाव्दारे कळविण्यांत येईल. यास्तव उमेदवारांनी आपली वैयक्तीक माहितीत त्यांच्या ई मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रंमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखती साठी पात्र उमेदवारांची यादी कार्यकारी अभियंता जहगांव पाटबंधारे विभाग जळगांव यांचे सूचना फलकावर रोजी प्रसिध्द करण्यांत येईल व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल. अंतिम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तीक ई मेल व्दारे/पोष्टाव्दारे कळविण्यांत येईल.

१९) सदर नियुक्ती क्षेत्रिय स्थळावर आवश्यक सिंचन व बांधकाम कामासाठी करण्यांत येत असून त्या साठी योग्य उमेदवार न भेटल्यास कांही किंवा सर्व /समिती ठरवेल तेवढे पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस आहे .

२०)करार पध्दतीने नियुक्त करण्यांत येणाऱ्या अधिकाऱ्यास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

२१) उपरोक्त अटी व शर्ती व्यतीरिक्त शासन / नियुक्ती अधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतिम राहतील

(ध.म्र.वेहेर)
कार्यकारी अभियंता,
जळगांव पाटबंधारे विभाग,
जळगांव



Scanned by CamScanner

## विहीत नमुन्यातील अर्ज

जलसंपदा विभागातील सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त अभियंता यांची नेमणूक करार पध्दतीने घेणे बाबतचा अर्ज

प्रति

कार्यकारी अभियंता
जळगांव पाटबंधारे विभाग
जळगांव

उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे

---

अर्ज केलेल्या पदाचे नांव :- ------------------------------------------------------------

१)अर्जदाराचे नांव :-
२)कायमचा पत्ता :-
३)दुरध्वनी क्रमाक /भ्रमणध्वनी सह (अनिवार्य) :-
४)ई-मेल (अनिवार्य) :-
५)सध्याचा पत्ता :-
६)जन्मतारीख :-
७)राष्ट्रीयत्व :-
८)प्रवर्ग :-
९)लिंग :- पुरुष/महिला
१०)अवगत भाष :-
११)शैक्षणिक माहिती :- पदवी/पदवविका/इतर
१२)अनुभव :-

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नांव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |

१३)सेवानिवृत्तीचा दिनांक :-
१४)सेवानिवृत्त ज्या कार्यालयातून झाले त्या कार्यालयाचे नांव :-
१५)सद्यस्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल :-

मला पूर्णपणे माहिती आहे की,पायाभुत सुविधा निर्मीती एमपॅनलमेंट द्वारे प्रकल्पाचे क्षेत्रिय कामाकरिता सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामांसाठी -------------- या पदाकरिता उमेदवाराची नियुक्ती करण्यांत येणार आहे. सदर पद प्रकलपाचे क्षेत्रिय कामासाठी एक वर्षासाठी आहे. कामाच्या निकडीनुसार कोणत्याही जिल्हयात /तालुक्यात माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,माझे माहिती प्रमाणे वर दिलेल्या तपशिल सत्य व अचुक आहे.यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पूर्ण सुचना शिवाय रद्द होईल.व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण:-

अर्जदाराचे नांव व सही

दिनांक:-



Scanned by CamScanner